## ४८. प्रथमोपचराची आवश्यक तंत्रे :

(अपघात व प्रथमोपचार)

| अपघात | प्रथमोपचार तंत्र |
|---|---|
| १) सर्पदंश | शिरेतून उताऱ्याचे इंजेक्शन देणे, आवळपट्टी व काठी बांधून हालचाल होऊ न देणे, श्वसन थांबत असल्यास निओस्टिग्मीन + ॲट्रोपीन इंजेक्शन शिरेतून देणे. |
| २) विंचूदंश | दंशाच्या जागी पोटॅशियम परमँगनेट दाबणे व लिंबू पिळणे. तुरटी भाजून लावणे, लिग्नोकेन इंजेक्शन देणे. |
| ३) जखमा | रक्तस्त्राव थांबवणे (दाब किंवा चिमटा) जखमा शिवणे, बांधणे. |
| ४) अस्थिभंग | अस्थिभंग बांधून स्थिर करणे. |
| ५) विद्युत धक्क्याने हृदयविकार झटका | कृत्रिम हृदयक्रिया (दाब देणे), कृत्रिम श्वसन (तोंडाने किंवा छातीवर दाब देऊन). |
| ६) बुडणे | छातीवर दाब देऊन पाणी बाहेर काढणे, घशातून द्राव काढणे (सक्शन), कृत्रिम श्वसन व हृदयक्रिया. |
| ७) पोटात विषारी पदार्थ जाणे | उलटी करवणे (मिठाचे पाणी पाजणे, घशात बोटे घालणे) कीटकनाशके असल्यास शिरेतून चार–पाच ॲट्रोपीन इंजेक्शने देणे. |
| ८) शोष (अतिसार), भाजणे, उष्माघात | जलसंजीवनी देणे, शिरेतून सलाईन देणे. |
| ९) खूप ताप चढणे | कोमट पाण्याने अंग पुसून ताप उतरवणे. |
| १०) बाळंतपण | नाळ बांधणे व कापणे, बाळाचा श्वसनमार्ग साफ करणे, रक्तस्त्राव आपोआप थांबत नसल्यास गर्भाशय चोळून, दाबून व मेथर्जिन इंजेक्शन देणे, स्वच्छ कपडा व हाताची मूठ वापरून गर्भाशय दाबणे व रक्तस्त्राव थांबवणे. |
| ११) कुत्रे चावणे | साबणाच्या पाण्याने जखमा धुवून काढणे |

ही प्रथमोपचाराची अंगे आत्मसात क्रणे तसे सोपे आहे. पण मुख्य म्हणजे प्राथमिक आरोग्यकेंद्र किंवा ग्रामीण रुग्णालयात ती प्रत्यक्ष पाहणे व शिकणे आवश्यक आहे. त्यामुळे त्यांचे तपशीलवार वर्णन इथे दिलेले नाही.